## आतील पानात वाचा

- रस्ते-'खड्डे' आणि लोकप्रतिनिधींची असंवेदनशीलता
- झेप्टोच्या बेकायदेशीर गाड्या आणि अल्पवयीन चालकांवर तात्काळ कारवाई करा...
- कोल्हापूर लई भारी, जिल्हा विकासाच्या कामगिरीत राज्यात अव्वलं...


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : ०८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२२ ऑगस्ट २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ताम्हिणी घाटात १० किमी लांबीचा बोगदा तयार होणार; दरड कोसळण्याच्या घटनांपासून होणार मुक्तता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२१, रायगड :** पावसाळ्यात अतिवृष्टी आणि दरडी कोसळण्याच्या घटनांमुळे महिनाभर वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागलेल्या ताम्हिणी घाटातील धोकादायक मार्गाला पर्याय म्हणून १० किलोमीटर लांबीचा बोगदा उभारण्याचा प्रस्ताव आहे. या कामासाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.

यासाठी महामार्ग विभागामार्फत निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी अलिबाग येथे पत्रकार परिषदेत दिली. यावेळी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे आणि जिल्हा परिषदेतील





पक्षप्रतोद अमित नाईक उपस्थित होते.

जुलै महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचा रायगड जिल्ह्यातील घाट मार्गांना मोठा फटका बसला. अनेक ठिकाणी भूस्खलन होऊन रस्ते बाधित झाले. पुणे आणि रायगड जिल्ह्याला जोडणाऱ्या ताम्हिणी घाटातील राष्ट्रीय महामार्गावरही दरडी कोसळल्याने वाहतूक जवळपास महिनाभर ठप्प होती. याचा परिणाम स्थानिक नागरिकांसह रायगडच्या पर्यटन व्यवसायावरही झाला.

**सुनील तटकरे नेमकं काय म्हणाले?**

ताम्हिणी घाटातील दरडी कोसळण्याचा धोका लक्षात घेऊन धोकादायक भाग वगळून दहा किलोमीटर लांबीचा बोगदा उभारण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे. बोगदा झाल्यास पावसाळ्यातील वाहतुकीतील अडथळे कमी होण्याबरोबरच प्रवासाचा वेळही वाचणार आहे. या प्रकल्पासाठी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी महामार्ग विभागामार्फत निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शवली आहे, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली.

**ताम्हिणी घाट महिनाभर बंद ठेवल्याने स्थानिकांचे नुकसान**

दरम्यान, मुसळधार पावसामुळे ताम्हिणी घाटात वेगवेगळ्या ठिकाणी दरळ कोसळल्याची घटना घडली. या घटनेमुळे ताम्हिणी घाटचा रस्ता जवळपास महिनाभर बंद राहिला. यामुळे ताम्हिणी घाटातील पर्यटन पूर्णपणे बंद झाले. त्याचा फटका स्थानिक व्यवसायिकांना बसला आणि त्याचा परिणाम रोजगारावरही झाला. ताम्हिणी घाटातील पर्यटनावर शेकडो कुटुंबांचा रोजगार अवलंबून आहे. त्यामुळे या मार्गावर काही पर्याय उपलब्ध झाल्यास छोटे व्यवसायिकांना दिलासा मिळू शकतो.

**चार रेल्वे उड्डाणपुलांची उभारणी होणार...**

दरम्यान, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अर्थात महारेल अंतर्गत कर्जत येथे तीन आणि नागोठणे येथे एक अशा चार रेल्वे उड्डाणपुलांची उभारणी करण्यात येणार आहे. या कामांसाठी सुमारे साडेचारशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असून, ही कामे लवकरच सुरू होतील, असा विश्वास तटकरे यांनी व्यक्त केला.

**माणगाव येथील बाह्यवळण रस्त्याची एक मार्गिका सुरु होणार**

मुंबई-गोवा महामार्गावरील सुकेळी खिंड येथील पथकर नाक्याला स्थगिती मिळाली असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच माणगाव येथील बाह्यवळण रस्त्याची एक मार्गिका गणेशोत्सवापूर्वी वाहतुकीसाठी सुरू करण्याचे नियोजन आहे. या मार्गिकेचे काम सध्या प्रगतीपथावर असल्याची माहितीही तटकरे यांनी दिली.

# खारघर हिल महापौर मॅरेथॉनवर प्रश्नचिन्ह

## प्रहार संघटनेची चौकशीची मागणी



**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.२१, पनवेल :** पनवेल महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने २३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या खारघर हिल महापौर मॅरेथॉन संदर्भात प्रहार जनशक्ती पक्षाने गंभीर आक्षेप नोंदवत या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. याबाबत प्रहार संघटनेच्या वतीने पनवेल महानगरपालिका आयुक्त तसेच महापौर यांना निवेदन देण्यात आले आहे.

प्रहार संघटनेच्या म्हणण्यानुसार, मॅरेथॉनसाठी नोंदणी करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेला टठ कोड स्कॅन केल्यानंतर नागरिकांना STRIDERSEVENTS.IN या खासगी पोर्टलवर नेले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या स्पर्धेच्या आयोजनात खासगी संस्थेची भूमिका काय आहे, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

संघटनेने उपस्थित केलेल्या प्रश्नांमध्ये या मॅरेथॉनला महानगरपालिकेच्या महासभेची मंजुरी घेण्यात आली आहे का, नोंदणी शुल्क कोणी निश्चित केले, नोंदणीद्वारे जमा होणारा निधी महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा होणार का, तसेच स्पर्धेच्या आयोजनासाठी ई-निविदा किंवा कोटेशन प्रक्रिया राबविण्यात आली होती का, यांचा समावेश आहे.

याशिवाय, स्पर्धेदरम्यान सहभागी धावपटूंना दुखापत झाल्यास जबाबदारी कोणाची राहणार, नोंदणीदरम्यान गोळा करण्यात येणाऱ्या नागरिकांच्या माहिती व कागदपत्रांची सुरक्षा कशी केली जाणार, तसेच संपूर्ण आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण कोणत्या पद्धतीने होणार, असे प्रश्नही उपस्थित करण्यात आले आहेत.

प्रहार संघटनेचा आरोप आहे की, महानगरपालिकेच्या नावाने आयोजित करण्यात येणाऱ्या या मॅरेथॉनमध्ये लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता कामकाज करण्यात आले असून, यामध्ये एका त्रयस्थ संस्थेला फायदा होईल अशा प्रकारे प्रक्रिया राबविण्यात येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

या संदर्भात प्रहार जनशक्ती पक्षाचे रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.सुनील शिरीषकर यांनी सांगितले की, नागरिकांकडून आकारण्यात येणाऱ्या शुल्काबाबत आणि सार्वजनिक निधीच्या वापराबाबत पूर्ण पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारे नागरिकांची आर्थिक फसवणूक किंवा सार्वजनिक निधीचा गैरवापर होत असेल, तर त्याची चौकशी होणे गरजेचे आहे.

> या प्रकरणाची तात्काळ चौकशी सुरू करण्यात यावी. जनतेच्या पैशांची चुकीच्या पद्धतीने लूट होत असेल, तर नागरिक आणि करदाता म्हणून आम्ही ते सहन करणार नाही. यासंदर्भात महापौरांनाही निवेदन देऊन चौकशीची मागणी करण्यात आली आहे.
>
> **- डॉ.सुनील शिरीषकर,**
> **जिल्हाध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष, रायगड**

# अहिल्यानगर तालुक्यातील ५४ स्टोन क्रशर सील; गौण खनिज माफियांना दणका

## ◆ कागदपत्रांसह हिशोब सादर करण्याचे आदेश ◆ ईटीएस मोजणीद्वारे उत्खननाची तपासणी



### उत्खनन आणि स्वामित्वधनाचा ताळमेळ तपासणार

जिल्हाधिकारी कार्यालयात १७ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार संबंधित खाणपट्ट्यांची तात्काळ ईटीएस मोजणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधित गटातून परवानगीच्या कालावधीत प्रत्यक्ष किती गौण खनिजांचे उत्खनन झाले आणि त्याप्रमाणे शासनाकडे किती स्वामित्वधन जमा करण्यात आले. याचा सविस्तर ताळमेळ तपासला जाणार आहे.

याशिवाय संबंधीतांना आपला लेखी खुलासा, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडील तपासणी अथवा ना - हरकत प्रमाणपत्र आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील तपासणी अथवा ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ही पूर्तता होईपर्यंत स्टोन क्रशर सुरू करता येणार नाही.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक आणि अनधिकृत स्टोन क्रशरविरोधात महसूल प्रशासनाने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. विधिमंडळ अंदाज समितीच्या जिल्हा दौर्यादरम्यान प्राप्त झालेल्या तक्रारी तसेच नगर शहराजवळील कापूरवाडी व वारूळवाडी परिसरातील पाहणीनंतर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. नगर तालुक्यातील कापूरवाडी येथील ३६ आणि खंडाळा परिसरातील १८, अशा ५४ स्टोन क्रशरवर सीलची कारवाई करण्यात आली आहे. तहसीलदार मिलिंद कुलथे यांनी या कारवाईला दुजोरा दिला.

संबंधित स्टोन क्रशर चालकांना नोटिसा बजावून क्रशर पूर्णतः बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रशासनाची परवानगी न घेता पुन्हा क्रशर सुरू केल्याचे आढळल्यास नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला आहे. विधिमंडळ अंदाज समितीचा ६ ते ८ ऑगस्टदरम्यान अहिल्यानगर जिल्हा दौरा झाला. या दौर्यात अवैध गौण खनिज उत्खनन, वाहतूक आणि अनधिकृत स्टोन क्रशरबाबत समितीसमोर तक्रारी मांडण्यात आल्या. त्यानंतर ७ ऑगस्ट रोजी समितीने कापूरवाडी व वारूळवाडी परिसरातील उत्खननस्थळांची पाहणी केली.

पाहाणी दरम्यान डोंगर पोखरल्याचे तसेच डंपरची वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने समीतीने नाराजी व्यक्त केली. अवैध उत्खननामुळे परिसरातील जुनी टेकडी सपाट झाल्याची तक्रारही स्थानिकांनी समितीसमोर मांडली. कोट्यवधी रुपयांचा दंड अद्याप वसूल न झाल्याबाबत समितीने गंभीर नाराजी व्यक्त करत, तक्रारीची वाट न पाहता सुमोटो कारवाई करून दोषींवर जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले.

# बाह्यवळण रस्ता व रेल्वे उड्डाणपुलामुळे लासलगावची वाहतूक कोंडी सुटणार

## छगन भुजबळ यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन संपन्न

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२१, लासलगाव (नाशिक) :** लासलगाव शहरातील वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या बाह्यवळण रस्ता, पोहोच मार्ग आणि रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण आज शुक्रवार (दि. २१ ऑगस्ट) रोजी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगनरावजी भुजबळ यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या प्रकल्पासाठी सुमारे १०९.६८ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.

या वेळी मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते लासलगाव बाह्यवळण रस्ता, रेल्वे उड्डाणपूल, लासलगाव-पाटोदा रस्त्यावरील बाजारतळ येथील पुलाचे लोकार्पण करण्यात आले; तसेच लासलगाव-पालखेड-पिंपळगाव बसवंत रस्त्याच्या रुंदीकरण कामाचे भूमिपूजनही




पार पडले.

**नागरिक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा !**

लासलगाव शहरातून धावणारी अवजड वाहनांची वाहतूक आता बाह्यवळण रस्त्यावरून वळवली जाणार असल्याने शहरातील अंतर्गत रस्त्यांवरील ताण लक्षणीयरीत्या कमी होईल. शिवाय, रेल्वे उड्डाणपुलामुळे रेल्वे गेटवरील वारंवार होणारी वाहतूक कोंडी संपून नागरिकांचा वेळ वाचणार असून शहराची वाहतूक अधिक सुरक्षित व सुरळीत होणार आहे.

या सोहळ्यास माजी खासदार समीर भुजबळ, मुंबई बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, लासलगाव बाजार समितीचे सभापती डी. के. जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप खैरे, विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब भवर, उपसभापती ललित दरेकर, जि. प. चे माजी अध्यक्ष पंढरीनाथ थोरे, बाळासाहेब क्षीरसागर, डॉ. श्रीकांत आवारे, तानाजी आंधळे, सुवर्णाताई जगताप, सोनिया होळकर, सरपंच योगिता पाटील आदी प्रमुख उपस्थित होते.

याशिवाय तहसीलदार विशाल नाईकवाडी, सहाय्यक गटविकास अधिकारी पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता प्रकाश घोडे, शाखा अभियंता गणेश चौधरी, संकेत चौधरी, लासलगाव बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी, शेतकरी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## निकालाची वेळ

सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हासंबंधीच्या सुनावणीकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. उद्धव ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाचा निर्णय, मूळ राजकीय पक्षाचे अस्तित्व, विधिमंडळ पक्षाचे बहुमत आणि पक्षांतरानंतर पक्षावर दावा करता येतो का, असे महत्त्वाचे घटनात्मक मुद्दे मांडले आहेत. या खटल्याने मात्र त्यापेक्षा मोठा प्रश्न देशासमोर आणला आहे. एखाद्या घटनात्मक वादाचा निकाल इतक्या उशिरा लागला की दरम्यान मूळ परिस्थितीच अपरिवर्तनीय झाली, तर नंतर मिळालेल्या न्यायाचे प्रत्यक्ष मूल्य किती उरते?

घटनेतील दहावी अनुसूची पक्षांतर रोखण्यासाठी आहे. तिच्या परिच्छेद ६ नुसार अपात्रतेच्या प्रश्नाचा निर्णय विधानसभा अध्यक्ष करतात. किहोतो होल्लोन विरुद्ध झाकिल्लू या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांचा निर्णय घटनात्मक न्यायालयांच्या न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर नाबाम रेबिया वि. उपसभापती या प्रकरणात पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने महत्त्वाचे तत्त्व मांडलेविधानसभा अध्यक्षांना हटविण्याचा ठराव विचाराधीन असताना त्यांनी दहाव्या अनुसूचीखालील अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय देऊ नये.

पुढे केशम मेघचंद्र सिंग विरुद्ध सभापती या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने, अपवादात्मक परिस्थिती वगळता, पक्षांतरबंदीच्या याचिकांचा निर्णय साधारण तीन महिन्यांत व्हावा, असे म्हटले. कारण विधानसभेचा कार्यकाळच पाच वर्षांचा असताना अपात्रतेचा निर्णय वर्षानुवर्षे प्रलंबित राहिला, तर कायद्याचा मूळ उद्देश निष्प्रभ होऊ शकतो. म्हणजेच पक्षांतरबंदी कायद्याच्या परिणामकारकतेचा आत्माच 'वेळ' आहे. जून २०२२ मध्ये महाराष्ट्रात निर्माण झालेल्या राजकीय संकटात आमदारांची अपात्रता, अध्यक्षांचे अधिकार, राज्यपालांची भूमिका, पक्षाचा आदेश, विधिमंडळ पक्ष आणि मूळ राजकीय पक्षाचे परस्परसंबंध असे अनेक प्रश्न निर्माण झाले. अध्यक्षांविरुद्ध हटविण्याची नोटीस दिली की त्यांच्या अपात्रता ठरविण्याच्या अधिकारावर मर्यादा येते का आणि त्यामुळे पक्षांतरबंदीचा उद्देश निष्प्रभ होतो का, हा देशव्यापी प्रश्न ठरला. मे २०२३ मध्ये तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने सुभाष देसाई वि. प्रधान सचिव, महाराष्ट्र या प्रकरणात अनेक मुद्दे हाताळले आणि नाबाम राबियामधील तत्त्वाच्या अचूकतेचा पुनर्विचार सात न्यायाधीशांच्या मोठ्या पीठाने करावा, असे ठरवले. इथेच घटनात्मक न्यायातील वेळेचे महत्त्व ठळक होते. प्रश्न सात न्यायाधीशांच्या पीठाकडे पाठविण्याइतका मूलभूत आहे; पण अंतिम उलगडा होईपर्यंत ज्या राजकीय परिस्थितीतून तो निर्माण झाला, तीच इतिहासजमा झाली, तर मूळ पक्षकारासाठी न्यायाचे स्वरूप काय उरते?

दरम्यान सरकार कार्यरत राहिले, विधानसभेचा कार्यकाळ संपला, महाराष्ट्राने पुढील विधानसभा निवडणूक पाहिली आणि राजकीय समीकरणे बदलली. त्यामुळे आज प्रश्न केवळ 'निकाल काय?' एवढाच नाही; 'त्या निकालाचा मूळ वादावर प्रत्यक्ष उपयोग आता किती?' हाही आहे.

सात न्यायाधीशांच्या पीठाचा भावी निर्णय अर्थातच निरर्थक ठरणार नाही. तो भविष्यातील सरकारे, अध्यक्ष आणि पक्षांतराच्या प्रकरणांसाठी महत्त्वाचा न्यायनिर्देशक ठरेल. परंतु २०२२ च्या मूळ घटनात्मक पेचासाठी त्याचे उपचारात्मक मूल्य काळाबरोबर कमी होत जाते. अंतिम निकाल येईपर्यंत घटनात्मक परिस्थिती अपरिवर्तनीय सत्य बनते. हा मोठा विरोधाभास आहेनिकाल देशाच्या भविष्यासाठी मौल्यवान ठरू शकतो; पण ज्या पक्षकाराच्या प्रकरणातून तो निर्माण झाला, त्याच्यासाठी त्याचे प्रत्यक्ष मूल्य जवळजवळ संपलेले असू शकते. शिवसेना प्रकरण एकमेव नाही. निवडणूक रोखे योजनेविरुद्धची याचिका २०१७ मध्ये दाखल झाली. योजना अनेक वर्षे सुरू राहिली. अखेर फेब्रुवारी २०२४ मध्ये पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने ती असंवैधानिक ठरवली आणि राजकीय निधीची माहिती न देणे हे नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराचे उल्लंघन असल्याचे स्पष्ट केले. निकाल ऐतिहासिक होता; पण २०१७ ते २०२४ दरम्यान निर्माण झालेले राजकीय परिणाम मागे फिरवता आले का?

नोटाबंदीवरील घटनात्मक आव्हानाचा अंतिम निर्णय जानेवारी २०२३ मध्ये आला. तोपर्यंत ८ नोव्हेंबर २०१६ ची प्रक्रिया इतिहासजमा झाली होती. अनुच्छेद ३७० बाबत ऑगस्ट २०१९ मधील बदलांवरील अंतिम निर्णय डिसेंबर २०२३ मध्ये आला. निकाल योग्य की अयोग्य हा येथे मुद्दा नाही; मुद्दा आहे घटनात्मक कृती आणि तिच्या अंतिम न्यायालयीन परीक्षणामधील विलंब.

**- राजीव शहा**

# रस्ते-'खड्डे' आणि लोकप्रतिनिधींची असंवेदनशीलता

रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघात होणे हे आता नित्याचेच झाले आहे मात्र यात अनेक निष्पापांचे जीव जात आहेत, काही दिवसांपूर्वी एका अपघातात डोळ्यादेखत आपल्या मुलाचा मृत्यू पहाण्याची वेळ एका पित्यावर आली हे अतिशय दुर्दैवी आहे. मात्र अशावेळी देखील एक आमदार असलेल्या लोकप्रतिनिधीं किमान सहानुभूती न दाखवत रस्ते आहेत तर खड्डे पडणारच असे वक्तव्य करून आपली असंवेदनशीलता दाखवली हे असमर्थनीयच आहे. एक लोकप्रतिनिधीं तर नागरिकांनाच घरे घेतांना तुम्ही रस्ते आहेत कि नाही, सोयीसुविधा आहेत कि नाही हे का बघत नाहीत असे ऊपदेशाचे डोस पाजत आहे मात्र जिकडेतिकडे अवैधधंदे, अवैध बांधकामे, यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कोण संरक्षण देतो हे कळण्या इतपत जनता नक्कीच सुज्ञ आहे.




लोकप्रतिनिधीं होताच अल्पावधीतच करोडोंची माया कशी जमा होते हे मात्र कोणीही लोकप्रतिनिधीं जनतेला कळु देत नाही. आपण सत्ताधारी झालो म्हणजे आपण काहीही बोलु शकतो, बरळु शकतो, प्रसंगी कोणालाही मारहाण करू शकतो, अर्वाच्य भाषा वापरु शकतो, गुन्हे करु शकतो अशीच बहुतांश लोकप्रतिनिधींची मानसिकता आणि कार्यपद्धती दिसते. जिकडेतिकडे लुटमार चालली आहे त्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर नक्कीच येते. राज्यातील जवळपास पन्नास टक्के लोक प्रतिनिधींवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत याचा अर्थ कसा घ्यायचा?. आपण जनतेच्या तिजोरीचे विश्वस्त आहोत मालक नाही या मानसिकतेतून लोकप्रतिनिधींनी बाहेर पडायला हवे. सत्ता, अधिकार याचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक होत आहे. आता नाशिक मधे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने भ्रष्टाचाराच्या अनेक सुरस कथा बाहेर येऊ लागल्या आहेत त्यात लोकप्रतिनिधींची काहीच भुमिका नसावी हे शक्य नाही.

जनतेच्या मुलभूत गरजा असलेले आरोग्य, शिक्षण, अन्न वस्त्र निवारा , दळणवळण ऊपलब्ध करून देणे ही शासन व्यवस्थेची जबाबदारी आहे आणि शासन प्रशासन व्यवस्थेकडुन काम करवुन घेणे ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे त्याच अपेक्षेने जनता लोकप्रतिनिधींना निवडुन देते आणि त्याच साठी त्यांना जनतेच्या तिजोरीतुन सोयीसुविधा, आर्थिक लाभ दिले जातात. मात्र गेल्या काही वर्षांपासून राजकारण आणि सत्ताकारणाचे संदर्भच बदलुन गेले आहेत त्यामुळे भ्रष्टाचाराची एक साखळीच निर्माण झाली आहे त्यामुळे विकासाच्या नावाखाली जिकडेतिकडे करोडो रुपये खर्च होत असले तरी विकास कोणाचा होतो आहे हे ये पब्लिक है ये सब जानती है. ज्यांनी प्रशासनावर वचक ठेवायला हवा, दबाव ठेवायला हवा तेच लोकप्रतिनिधीं भ्रष्टाचाऱ्यांना पाठिशी घालत आहेत नव्हे ते देखील यात सामील आहेत का यावर मोठेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. लोकप्रतिनिधीं किमान संवेदनशीलता दाखवायला हवी मात्र अनेकदा लोकप्रतिनिधीं हे संवेदनशीलता दाखवण्याऐवजी जनतेच्या जखमेवर मीठ चोळत आहे. आपण लोकप्रतिनिधीं झालो म्हणजे आम ची जबाबदारी काही नाही, आम्हाला कोणी प्रश्न विचारु नये, आम्ही कोणाला ऊत्तरदायी नाही या मानसिकतेतून लोकप्रतिनिधींनी बाहेर पडायला हवे. लोकप्रतिनिधींनी हे समाजाला दिशा दाखवतात म्हणूनच मोठ्या विश्वासाने, अपेक्षेने जनता त्यांच्याकडे राज्यव्यवस्था चालविण्याची जबाबदारी देते.



**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

# देशातील चार हजार पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदार गुन्हेगारीच्या खटल्यांच्या रांगेत असेल तर; देशाच्या जनतेने काय करावे?

देशातील आमदार-खासदार जर गुन्हेगारीतुन संविधानिक पदावर बसत असेल तर देशाचे पुढील भवितव्य किंवा भविष्य जेन-झीसाठी किंवा जेन-अल्फासाठी धोका निर्माण करू शकते.कारण देशातील ४००० पेक्षा जास्त आजी-माजी आमदार-खासदारांविरूध्द एकूण ४१९२ गुन्हेगारी प्रकरणातील खटले आजही प्रलंबित आहेत. तरीही लोकप्रतिनिधींचा बहुमान;हा तर लोकशाहीचा घोर अपमान व जेन-झीवर आणि जेन-अल्फावर घणाघाती प्रहारच म्हणावा लागेल.राजकीय पुढाऱ्यांच्या या चुकीच्या मार्गामुळे देशात कोणत्या प्रकारची लोकशाही आहे हे कळायला मार्ग नाही. देशात एकीकडे भ्रष्टाचाराचा महापूर दिसून येतो तर दुसरीकडे गुन्हेगारीचे प्रलंबित खटले यामुळे देशातील मुठभर राजकीय पुढारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झाल्याचे दिसून येते;तर दुसरीकडे बेरोजगारी,म हागाई,शिक्षण इत्यादी अनेक समस्यांचा मोठा डोंगर उभा आहे व त्यात भर टाकत आहे गुन्हेगारीचे खटले असणारे आमदार-खासदार हे तर लोकशाहीला काळीमा फासणारी घटना म्हणावी लागेल.कारण ज्यांना आपण लोकप्रतिनिधी समजतो आणि देशासह राज्यांचा कारभार पहातात अशा आमदार-खासदारांवर गुन्हे असतांना सरकारच्या सुरक्षेयंत्रणेखाली वावरतात व देशाच्या १४५ कोटी जनतेला ग्यान पाजतात हे कसले लोकप्रतिनिधी म्हणावेत हे तर देशाचे मुख्य कसाईच म्हणावे लागेल. कारण देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक,गंभीर व देशाला धक्का देणारी माहिती समोर आली आहे.लोकसभेतील ५४३ खासदारांपैकी २५१,तर राज्यसभेतील २३३ खासदारांपैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी प्रकरणातील खटले प्रलंबित आहेत.म्हणजे देशातील अर्धे खासदार गुन्हेगारी क्षेत्रातुन येवून दिल्लीत लोकसभेत व राज्यसभेत बसले आहेत ही कीती शर्मेची बाब म्हणावी! यावरून स्पष्ट होते की, देशात किंवा राज्यात जे काही गुन्हेगारी प्रवृत्ती दिसून येते त्याला कारणीभूत देशातील गुन्हेगार लोकप्रतिनिधीच(गुन्हेगार आमदार-खासदार) म्हणावे लागेल.त्याचप्रमाणे देशातील २८ राज्यांपैकी १४ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी स्वतःविरूद्ध गुन्हेगारी प्रकरणे असल्याचे जाहीर केले.तरीही ते आजही मुख्यमंत्री पदावर विराजमान आहेत ही किती लाजीरवाणी व शर्मेची गोष्ट म्हणावी.म्हणजे आपण गुन्हेगार आहोत आणि महत्वपूर्ण पदावर बसण्यालायक नाही हे माहीत असूनही महत्वाच्या पदांवर कार्यरत आहेत यावरून स्पष्ट होते की, देशातील आजी-माजी आमदार-खासदार कायदा,स्वाभिमान,संविधान,लोकशाही, लोकांच्या वेदना व देशाचे हित बाजूला सारून महत्त्वाच्या पदांवर विराजमान आहेत ही अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर बाब म्हणावी लागेल. भारतात लोकशाही आहे आणि लोकशाही प्रमाणे देश चालतो असे म्हटले जाते.परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे, देशातील राजकारण्यांच्या गुन्हेगारीकरणाबाबत सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अहवालातून चिंताजनक व गंभीर माहिती समोर आल्याने देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावनांचा दुखावल्या आहेत.ऑगस्ट २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या अधिकृत अहवालानुसार, देशातील ३२६ खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यामध्ये लोकसभेतील ५४३ पैकी २५१ खासदार आणि राज्यसभेतील २३३ पैकी ७५ खासदारांवर गुन्हेगारी खटले आहेत.म्हणजे लोकसभेच्या ४६ टक्के खासदारांवर गुन्हेगारी स्वरूपाचे खटले आहेत तर ३३ टक्के गुन्हेगारी खटले राज्यसभेच्या खासदारांवर आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे लोकसभेच्या २५१ पैकी १७० खासदारांवर अत्यंत गंभीर स्वरूपाचे गुन्हे (उदा. खून, खुनाचा प्रयत्न,अपहरण आणि महिलांविरोधातील गुन्हे) दाखल आहेत तरी ते लोकप्रतिनिधी आहेत.राज्यसभेच्या बाबतीत विचार केला तर गंभीर गुन्हे असलेल्या ७५ खासदारापैकी ४० खासदारांवर ५ वर्षे किंवा त्याहून अधिक काळाच्या शिक्षेची तरतूद असलेले गंभीर गुन्हे दाखल आहेत.म्हणजे अर्धा देश गुन्हेगार आमदार-खासदांच्या मार्गदर्शनाखाली चालतो की काय असे चित्र दिसत आहे.महत्वाचे म्हणजे एकूण प्रलंबित खटल्यामध्ये देशातील ४००० पेक्षा अधिक आजी-माजी आमदार-खासदारांवर ४,१९२ हून अधिक फौजदारी खटले सध्या न्यायालयात प्रलंबित आहेत.अहवालानुसार राज्यनिहाय आकडेवारीचा विचार केला तर केरळ राज्यातील सर्वाधिक म्हणजेच ९५% (२० पैकी १९) खासदारांवर गुन्हे दाखल आहेत. त्यापाठोपाठ तेलंगणामध्ये ८२% आणि ओडिशामध्ये ७६% खासदारांची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची आहे. महाराष्ट्र,उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालमधील सुमारे ५०% खासदारांवर गुन्हेगारी खटले सुरू आहेत.म्हणजे देश कुठे जात आहे याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी करने गरजेचे आहे.अहवालानुसार २८ राज्यांपैकी १४ राज्यातील मुख्यमंत्र्यांवर फौजदारी खटले आहेत यात प्रामुख्याने तेलंगणाचे मुख्यमंत्री अनुमुला रेवंत रेड्डी यांच्या विरुद्ध सर्वाधिक ८९ प्रकरणे आहेत, पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुबेंदू अधिकारी यांच्या विरुद्ध २९ प्रकरणे आहेत, कर्नाटकचे मुख्यमंत्री बी.के.शिवकुमार यांच्या विरुद्ध १९ प्रकरणांची नोंद असल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे १४ राज्यांच्या वेगवेगळ्या मुख्यमंत्र्यांवर गुन्हेगारी खटले प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत सर्वप्रथम गुन्हेगारी प्रकरणातील खटल्याचा निकाल जलदगतीने लावून या आमदार-खासदारांची विल्हेवाट लावून यांना ताबडतोब बर्खास्त करून यांचे पगार,पेन्शन,भत्ते रद्द केले पाहिजे व त्यांनी केलेल्या गुन्ह्याची शिक्षा त्यांना मिळायला पाहिजे. कारण कोणताही लोकप्रतिनिधी असो त्यांच्यावर असलेले गंभीर गुन्हे देशाला व देशहिताला घातक ठरू शकते. त्यामुळे देशातील संपूर्ण गुन्हेगारी प्रवृत्तीच्या आमदार-खासदारांच्या मुसक्या महामहीम राष्ट्रपती,सुप्रीम कोर्ट व सरकारनी कायद्याच्या मार्फत आवळल्या पाहिजे अशी या लेखाद्वारे विनंती करतो.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## श्वास घेणारं मंदिर

आज मंदिरातील संगमरवर फोडला तसा,
आतील दगडांनी हलकेच श्वास घेतला,
शतकांच्या शांततेत अडकलेला हुंदका
पहिल्यांदाच ओठांवर येऊन थबकला.

त्या शुभ्र, गार थराखाली
कितीतरी वेदना गाडून ठेवल्या होत्या,
आरतीच्या प्रकाशामागे
अंधाराने स्वतःच्या जखमा झाकल्या होत्या.

भक्त येत होते, हात जोडत होते,
देवापाशी सुखांची याचना करत होते,
पण त्या भिंतींमध्ये कुठेतरी
दुःखही रोज नतमस्तक होत होतं.

घंटांच्या आवाजात हरवून गेले होते
काही न बोलेले प्रश्न,
धूपाच्या धुरासोबत विरघळत होते
मनातले कितीतरी आक्रोश.

आज जेव्हा हातोड्याचा पहिला घाव बसला,
तेव्हा मंदिर थोडंसं हादरलं,
आणि आत खोलवर दडलेला
एक कैद श्वास मोकळा झाला.

संगमरवर तुटत गेला तसा
दगडही जिवंत भासू लागले,
आणि ते निःशब्द देऊळ अचानक,
श्वास घेणारं मंदिर होऊन गेलं.

त्यांच्या छातीतही कुठेतरी
वेदनांचे पक्षी फडफडू लागले.
कळलं मग,
प्रत्येक सुंदर वस्तूच्या आत
एक तडा लपलेला असतो.

लोकांना दिसतात फक्त शिखरं,
कोरलेली नक्षी, दिव्यांची झळाळी,
पण पाया मात्र शांतपणे
साऱ्या वेदनांचं ओझं वाहत असतो.

आज मंदिरातील संगमरवर फोडला तसा,
आतील दगडांनी रडून घेतलं,
आणि वर्षानुवर्षे गोठलेलं दुःख
पहिल्यांदाच पावसासारखं बरसलं.

कारण काही वेळा तुटणं म्हणजे अंत नसतो,
तो तर नव्या श्वासाचा आरंभ असतो,
जिथे वेदनांनाही आवाज मिळतो,
आणि दगडांनाही श्वास मिळतो.

**- कीर्तिराज शैलेंद्र आगलावे,**
**पुणे,**
**मो.९०११८४१२१२**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# कोल्हापूर लई भारी, जिल्हा विकासाच्या कामगिरीत राज्यात अव्वलं

जिल्हा विकासाच्या कामगिरीत कोल्हापूरने पुन्हा एकदा राज्यात आपला ठसा उमटविला आहे. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येत असलेल्या महास्ट्रॉईड प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोल्हापूर जिल्ह्याने शंभर टक्के गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकवला आहे.

त्यामुळे विकासाच्या कामगिरीत आपले स्थान अधिक बळकट करुन राज्यात पुन्हा एकदा कोल्हापूर लई भारी असल्याचे अधोरेखित केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर जिल्ह्याला १६ कोटी रुपयांचा प्रोत्साहन निधी मिळणार आहे महास्ट्रॉईड अर्थात महाराष्ट्र जिल्हास्तरीय विकासाला चालना देण्यासाठी संस्थात्मक क्षमता बळकटीकरण प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यात आले होते. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन आणि नियोजन विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०२५ /२६ या वर्षासाठी हे मूल्यांकन झाले होते. या मूल्यांकनाची संस्थेमार्फत स्वतंत्र पडताळणी करण्यात आली होती. या प्रक्रियेत एकत्रित किमान ६० टक्के गुण मिळविणारे महाराष्ट्रातील १३ जिल्हे प्रोत्साहन निधीसाठी पत्र ठरले आहेत.

त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्याने शंभर टक्के गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले आहे त्यामुळे जिल्ह्याला १६ कोटींचा प्रोत्साहन निधी मंजूर झाला आहे. हा निधी जिल्ह्यातील विकासकामांना उभारी देण्यासाठी महत्वाचा ठरणारं आहे. या विकासात्मक कामगिरीबद्दल सर्वत्र जिल्हा प्रशासनाचे कौतुक होत असून प्रशासनाच्या विविध विभागांनी केलेल्या समन्वयपूर्ण कामाचा हा परिणाम असल्याचे मानले जात आहे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# दिव्यात शैलेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, दिवा, (ठाणे) :** शिवसेना दिवा उपशहर प्रमुख तथा ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक शैलेश मनोहर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम ाचे आयोजन करण्यात आले. यावेळी हजारो शालेय विद्यार्थ्यांना वह्या, स्कूल बॅग व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणासाठी आवश्यक साहित्य घेणे अडचणीचे ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा मोठा लाभ झाला. तसेच गरजू व गरीब कुटुंबांना अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. उपस्थित नागरिक व कार्यकर्त्यांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

सदर सामाजिक उपक्रमाला विविध मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांची उपस्थिती लाभली. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मान्यवरांनी शैलेश पाटील यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याबरोबरच गरजू कुटुंबांना मदतीचा हात देत वाढदिवस सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# खिडकाळी शाळा क्र.८९ धोकादायक तरीही दुरुस्तीचा घाट; वेदिका पाटील आक्रमक

## धोकादायक शाळेच्या दुरुस्तीवरून नगरसेविका आक्रमक; उप-आयुक्तांना निवेदन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२१, दिवा (ठाणे) :** ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समिती अंतर्गत खिडकाळी गावातील मराठी शाळा क्रमांक ८९ ची इमारत अत्यंत धोकादायक असतानाही प्रशासनाने केवळ दुरुस्तीचे काम सुरू केल्याने पालकांमध्ये संताप आहे. लोकप्रतिनिधींना अंधारात ठेवून काम सुरू केल्याचा आरोप नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांनी महासभेत केला होता. आता त्यांनी उप-आयुक्त, शिक्षण विभाग यांनाही निवेदन दिले आहे. पालकांच्या तक्रारीनंतर नगरसेविका पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, दिवा प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता माने, उपअभियंता भालेराव आणि शिक्षणाधिकारी शाळेची पाहणी केली होती. छत व भिंतीचे प्लास्टर निखळलेले, खिडक्या तुटलेल्या, बाथरूममधील स्टील उघडे पडून गंजलेले तसेच कॉलम आणि बीमचे जॉइंट खराब असल्याचे निदर्शनास आले. ही इमारत दुरुस्ती लायक नसून नवीन इमारत उभारावी, विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करावी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी नगरसेविका वेदिका पाटील यांनी निवेदनातून केली आहे. निकृष्ट दुरुस्ती करून प्रशासन विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप करीत, ठाणे महापालिका नक्की कोणाची, ठेकेदारांची की विद्यार्थ्यांची? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. इमारत कोसळून दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

# शेतकऱ्यांना आता घरबसल्या खत बुकिंगची सुविधा

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नव्या ऑनलाइन प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करावा. या प्रणालीमुळे खताची उपलब्धता, बुकिंग व खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे. २५ ऑगस्टपासून हे अॅप सुरू होणार असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अॅपचा वापर करावा.

ऑनलाइन अर्ज, खताची उपलब्धता, बुकिंग किंवा खत वितरणासंदर्भात कोणतीही अडचण आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती कृषी अधिकारी किंवा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

**– वंदना शिंदे (जिल्हा कृषी अधीक्षक, रायगड)**

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२१, पेण :** शेतकऱ्यांना खते खरेदी करणे अधिक सुलभ, पारदर्शक आणि सोयीचे व्हावे, यासाठी खत खरेदीसाठी नवीन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीची सुरुवात २५ ऑगस्टपासून होणार आहे. केंद्र शासनाच्या कृषी विभागामार्फत रायगड जिल्ह्यात खत खरेदी-विक्रीसाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' ही प्रणाली लागू करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे शेतकऱ्यांना खत उपलब्ध आहे की नाही, याची माहिती घेण्यासाठी कृषी केंद्रावर फेऱ्या मारण्याची गरज राहणार नसून मोबाईल अॅपच्या माध्यमातून घरबसल्या आवश्यक खताची बुकिंग करता येणार आहे.

या ऑनलाइन प्रणालीमुळे खताची उपलब्धता, बुकिंग आणि वितरण प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक होणार असून त्याचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळणार आहे. शेतकरी आपल्या मोबाईलवरून आवश्यकतेनुसार खत विक्रेत्याकडून युरिया, डीएपी तसेच इतर अनुदानित खतांची खरेदी करू शकतील.

शेतकऱ्यांनी मोबाईलवर 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' अॅप डाउनलोड करून फार्मर आयडी, आधार कार्ड तसेच जमिनीची माहिती भरावी. फार्मर आयडी उपलब्ध नसल्यास आधार क्रमांकाद्वारेही बुकिंग करता येणार आहे.

मोबाईल अॅपद्वारे लॉगिन केल्यानंतर आवश्यक खताची निवड करून उपलब्ध असलेल्या जवळच्या कृषी केंद्राची निवड करता येईल. बुकिंग पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्याला ठठ कोड किंवा टोकन क्रमांक मिळेल. हा ठठ कोड अथवा टोकन क्रमांक घेऊन संबंधित कृषी केंद्रावर जाऊन खताची खरेदी करता येणार आहे.

ठठ कोड किंवा टोकन क्रमांकाची वैधता दोन दिवस राहणार आहे. या कालावधीत खत घेता न आल्यास संबंधित बुकिंग रद्द करून पुन्हा बुकिंग करता येणार आहे. तसेच शेतकऱ्याला स्वतः खत खरेदीसाठी जाता येत नसल्यास त्याच्या वतीने प्रतिनिधीमार्फत खत घेण्याची सुविधाही उपलब्ध आहे.


रायगड जिल्ह्यात सध्या पुरेसे खत उपलब्ध असून खताची कुठलीही कमतरता भासणार नसल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले आहे. या प्रणालीच्या प्रभावी अंम लबजावणीसाठी जिल्हा व तालुका पातळीवरील अधिकारी-कर्मचारी तसेच कृषी निविष्ठा विक्रेत्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑनलाइन अर्ज, खताची उपलब्धता, बुकिंग किंवा खत वितरणासंदर्भात अडचण आल्यास संबंधित तालुका कृषी अधिकारी, गुणनियंत्रण निरीक्षक, पंचायत समिती कृषी अधिकारी किंवा कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## झेप्टोच्या बेकायदेशीर गाड्या, अल्पवयीन चालकांवर तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात प्रादेशिक परिवहन विभागाला युवासेनेचे निवेदन

# पुढील ४८ तासात कारवाई न झाल्यास युवासेना उतरणार रस्त्यावर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मिरा भाईंदर :** १० ते १५ मिनिटांत डिलिव्हरी देण्याच्या शर्यतीत मिरा-भाईंदर शहरात नियम धाब्यावर बसवणाऱ्या 'झेप्टो'सारख्या क्विक-कॉमर्स कंपन्या विरोधात आता युवासेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. बेकायदेशीर वाहने, आर.सी., फिटनेस आणि वैध परवान्याशिवाय गाड्या चालवणाऱ्या डिलिव्हरी चालकांवर तात्काळ जप्तीची कारवाई करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा युवासेना जिल्हा सचिव निखिल तावडे यांनी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.




शहरात क्विक-कॉमर्स कंपन्यांच्या नावाखाली वाहतूक नियमांचा उघडउघड चोऱ्यामोऱ्या सुरू असल्याचे चित्र रोज पाहायला मिळत आहे. वेळेत डिलिव्हरी देण्याच्या दबावामुळे अनेक चालक अत्यंत वेगाने व निष्काळजीपणे गाड्या चालवतात. यात अनेक ठिकाणी अल्पवयीन मुले, सुरक्षेची साधने नसलेली दुचाकी वाहने आणि विना-परवाना चालक रस्त्यांवरून धावताना दिसतात, त्यामुळे पादचारी व इतर वाहनचालकांच्या जिवाला थेट धोका निर्माण झाला आहे. आरटीओ विभागाच्या निष्क्रियतेमुळेच या कंपन्यांचे मालक आणि चालक कायद्याला पायदळी तुडवत असल्याचा आरोप या निवेदनातून करण्यात आला आहे.

**युवासेनेच्या प्रमुख मागण्या :-**

**✲ विशेष तपासणी मोहीम :-** मिरा-भाईंदरमध्ये धावणाऱ्या सर्व ऑनलाईन डिलिव्हरी वाहनांची (विशेषतः झेप्टो) आरटीओद्वारे तातडीने विशेष तपासणी करण्यात यावी.

**✲ गाड्या जप्त करा :-** वैध परवाना, फिटनेस, आर.सी., विमा आणि हेल्मेट नसणाऱ्या सर्व बेकायदेशीर वाहनांवर तात्काळ दंडात्म क व जप्तीची कारवाई व्हावी.

**✲ व्यवस्थापनावर गुन्हे दाखल करा :-** वेगाचे उल्लंघन करून चालकांच्या आणि नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण करणाऱ्या कंपन्यांच्या स्थानिक व्यवस्थापनावर (Management) कायदेशीर गुन्हे दाखल करावेत.

येत्या ४८ तासांत आरटीओ विभागाने या बेकायदेशीर डिलिव्हरी वाहनांवर आणि त्यांच्या वेअरहाऊसबाहेर उभ्या असणाऱ्या गाड्यांवर धडक कारवाई सुरू केली नाही, तर युवासेना स्वतः रस्त्यावर उतरून ही वाहने रोखेल आणि प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन करेल, असा इशारा निखिल तावडे यांनी दिला आहे.

**(युवासेना, मिरा-भाईंदर शहर)**

# टाकळी ढोकेश्वरमध्ये ३ दिवस रंगणार बैलगाडा शर्यतीचा थरार

## श्री.संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त पठार केसरी बैलगाड्यांच्या भव्य शर्यती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१,पारनेर (अहिल्यानगर) :** सालाबादप्रमाणे यंदाही टाकळी ढोकेश्वर येथे श्री संत सावता माळी महाराज पुण्यतिथी तसेच वै. विठ्ठल महाराज पायमोडे पुण्यतिथीनिमित्त टाकळी ढोकेश्वर येथे पारनेर तालुका पठार केसरी बैलगाडा शर्यतीचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. २२ ते सोमवार, दि.२४ ऑगस्ट रोजी कालावधीत महाराष्ट्रातील प्रसिद्ध गाडाम ालक उपस्थित राहणार असल्याची माहिती पारनेर तालुका बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण पायमोडे यांनी दिली. या तीन दिवसांच्या कालावधीत ही शर्यत रंगणार असून, पठार भागासह पारनेर तालुक्यातील बैलगाडा शौकिनांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या शर्यतीतील विजेत्या बैलगाडीला ८१ हजार रुपये व मानाची पठार केसरी ट्रॉफी, द्वितीय क्रम ांकासाठी ७३ हजार रुपये, तर तृतीय क्रमांकासाठी ३१ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय दररोज प्रथम, द्वितीय व तृतीय फलकफोड



करणाऱ्या बैलगाड्यांना आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

शर्यतीच्या अंतिम फेरीसाठीही आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. प्रथम फायनल क्रम ांकासाठी ३१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २२ हजार ५०० रुपये, तृतीय क्रमांकासाठी २५ हजार रुपये, चौथ्या क्रमांकासाठी १० हजार ५०० रुपये, पाचव्या क्रमांकासाठी ७ हजार ५०० रुपये आणि सहाव्या क्रमांकासाठी ५हजार रुपये अशी बक्षिसांची रचना करण्यात आली आहे. याशिवाय शर्यतीदरम्यान उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बैलगाड्यांसाठी विविध मानकरी व दात्यांच्या सहकार्याने आकर्षक ट्रॉफी व बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे तीनही दिवस बैलगाडा शर्यतीचा चुरशीचा सामना पाहायला मिळणार आहे.या आयोजनासाठी उद्योजक धनंजय निमसे, उद्योजक संतोष चौगुले, बाळशिराम पायमोडे, गणेश कोकाटे, दत्ता घुले, सोपान माने, बंडू मोरे, भैय्या इनामदार, कैलास ठुबे, बाळासाहेब लगड, बाळासाहेब रोकडे, विजय लोमटे, विलास घोलप,गितेश तमनर, ऋषिकेश कोकाटे, विलास भाईक, शिवाजी उंडे, दत्तात्रय काळनर आणि संदीप कुलट यांच्यासह विविध मागण्यांचे सहकार्य लाभत आहे.

बैलगाडा शर्यतीच्या निमित्ताने परिसरातील बैलगाडा मालक,चालक, शौकीन आणि नागरिकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. पारंपरिक बैलगाडा संस्कृतीचा उत्साह आणि थरार अनुभवायला मिळणार आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गावातील स्वच्छता व कचरा संकलनाचा प्रश्न ऐरणीवर; घंटागाडी नियमित सुरू करण्याची ग्रामसभेत मागणी

**अक्षराज : अलीम शेख**

**दि.२१, चारठाणा (परभणी) :** गावातील वाढत्या कचऱ्याची समस्या, नियमित कचरा संकलनाचा अभाव आणि सार्वजनिक ठिकाणी होत असलेल्या अस्वच्छतेच्या पार्श्वभूमीवर गावातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्याची मागणी करण्यात आली आहे. गावात स्वच्छता राखण्यासाठी कचरा संकलनाची घंटागाडी नियमि तपणे सुरू करावी, तसेच जमा होणाऱ्या कचऱ्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन व विल्हेवाट लावावी, अशी मागणी ग्रामसभेत निवेदनाद्वारे करण्यात आली.

गावातील विविध भागांमध्ये घरगुती तसेच इतर प्रकारचा कचरा जमा होत असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कचरा वेळेवर उचलला जात नसल्यास परिसरात दुर्गंधी निर्माण होण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्यावर ही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने स्वच्छतेच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमित कचरा संकलनाची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

याबाबत आसिफ शेखान पठाण, समीर खान आणि शेख अलीम यांच्या वतीने ग्रामसभेत निवेदन सादर करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य तहसीन भैया देशमुख यांची उपस्थिती होती. गावातील स्वच्छता व्यवस्था सुरळीत करण्यासाठी घंटागाडी नियमि तपणे प्रत्येक भागात फिरविण्यात यावी, कचरा ठराविक ठिकाणी संकलित करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात यावी, तसेच सार्वजनिक ठिकाणांची नियमित स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.



**प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याची अपेक्षा**

गाव स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी केवळ नागरिकांनी कचरा न करता स्वच्छतेची काळजी घेणे पुरेसे नसून, प्रशासनाकडूनही नियमित कचरा संकलन आणि योग्य कचरा व्यवस्थापनाची व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने निवेदनाची तातडीने दखल घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली.

गावातील स्वच्छता हा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाचा विषय असून, घंटागाडी नियमित सुरू करून कचरा संकलनाची व्यवस्था प्रभावीपणे राबविल्यास गावातील अस्वच्छतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी म ागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# आर.सी.पटेल बभळाज येथे शालेय विद्यार्थी आरोग्य तपासणी

**अक्षराज : नंदकुमार बोरसे**

**दि.२१, शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील बभळाज येथील आर.सी.पटेल माध्यमिक विद्यालयात उप जिल्हा रुग्णालय शिरपूर अंतर्गत आर. बी.एस.के. पथकाच्या वतीने इयत्ता पाचवी इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांचे शालेय आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ भूपेश माहेश्वरी व डॉ.शीतल राका यांनी अनुक्रमे विद्यार्थी व विद्यार्थिनींची डोळे, कान, पोटदुखी, सर्दी, खोकला, ताप, पोटाचे विकार इ. व डॉक्टर राका यांनी किशोरवयीन मुलींची तपासणी तसेच सर्व किरकोळ आजारांवर सुद्धा



तपासणी केली.

मुख्याध्यापक आर.एल.तवर यांनी विद्यार्थ्यांना बाहेरचे जंक फूड खाऊ नका ताज्या पालेभाज्या खा, आरोग्य तपासणी ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्वाचा भाग आहे, डॉ.भूपेश माहेश्वरी जे सांगतील त्याचे तंतोतंत पालन करा असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

डॉक्टर शितल राका यांनी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बी.व्ही.मोरे यांनी केली तर शालेय पोषण आहार प्रमुख आर.टी. पाटील यांनी आभार मानलेत.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा उप रुग्णालयाच्या औषध निर्माण अधिकारी तृष्णा सोनवणे तसेच विद्यालयातील सर्व वर्गशिक्षक बंधू भगिनी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

अक्षराज



# उक्षी रेल्वे थांब्याच्या लढ्याला संघटनात्मक बळ; 'उक्षी पंचक्रोशी रेल्वे संघर्ष समिती'च्या कोअर कमिटीची स्थापना

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, रत्नागिरी :** उक्षी रेल्वे स्थानकावर 'दिवा–सावंतवाडी' आणि 'सावंतवाडी–दिवा' या दोन्ही गाड्यांना थांबा मिळावा, या मागणीसाठी सुरू असलेल्या जनआंदोलनाला आता संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे. उक्षी पंचक्रोशी रेल्वे संघर्ष कमिटीच्या कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली असून, या माध्यमातून रेल्वे थांब्याच्या मागणीसाठी अधिक व्यापक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पाठपुरावा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

उक्षी पंचक्रोशीतील सुमारे २० ते २५ गावांसाठी उक्षी रेल्वे स्थानक हे महत्त्वाचे प्रवासी केंद्र आहे. या स्थानकावर उक्षी परिसरासह परचुरी, वांद्री, करबुडे, बावनदी, कोळंबे, आंबेड, सोनगिरी, मनसकोंड, कुरधुंडा, चाफे, ओरी, जाकादेवी, पोचरी, देण,खालगाव, फुणगूस, डिंगणी, रानपाट, लाजुल, सप्तलिंगी, नरबे, कोंडये, पीरंदवणे, उजगव, नांदळज, कोसुंब, ताम्हाणे, आंबवली आदी भागांतील नागरिक प्रवासासाठी अवलंबून आहेत.

पूर्वी या स्थानकावर दिवा–सावंतवाडी आणि सावंतवाडी–दिवा या दोन्ही गाड्यांना थांबा मिळत होता. मात्र, कोरोना महामारीनंतर रेल्वे वाहतूक पूर्वपदावर आल्यानंतर या गाड्यांचे उक्षी स्थानकावरील थांबे बंद करण्यात आले. परिणामी पंचक्रोशीतील नोकरदार, व्यावसायिक, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. या गाड्यांना पुन्हा थांबा मिळावा, यासाठी स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर उक्षी पंचक्रोशी रेल्वे संघर्ष कमिटीच्या माध्यमातून प्रशासन, कोकण रेल्वे आणि संबंधित लोकप्रतिनिधींकडे प्रभावीपणे पाठपुरावा करण्यासाठी कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे. मझम्मील काझी यांची अध्यक्षपदी, तर हरिश्चंद्र बंडबे आणि प्रदीप चंदरकर यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. रमेश मेस्त्री सचिव, अब्दुल मुनाफ खतिब सहसचिव, तर अविनाश कळंबटे खजिनदार म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

समितीच्या संघटकपदी वसंत मेस्त्री आणि चंद्रकांत वेद्रे, कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड. अरुण नागवेकर, तर सल्लागार म्हणून अनंत कळंबटे आणि गोविंद कळंबटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शरद जाधव आणि सुरेश कळंबटे यांच्यावर प्रवक्तेपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

कोअर कमिटीच्या सदस्यांमध्ये सत्यवान वेद्रे, रवींद्र जाधव, उदय बेनकर, नंदकुमार कुवार, गजानन पानगले, पांडुरंग पाताडे, जगन्नाथ दुदम, संदीप सापटे, नितीन



चंदरकर आणि प्रकाश शिगवण यांचा समावेश आहे.

उक्षी स्थानकावर बंद झालेले रेल्वे थांबे पुन्हा सुरू व्हावेत, हा केवळ उक्षी गावाचा प्रश्न नसून संपूर्ण पंचक्रोशीतील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाशी निगडित महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यामुळे या मागणीला व्यापक जनसमर्थन मिळवून देणे, प्रवाशांच्या अडचणी प्रशासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि रेल्वे प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे, या दिशेने संघर्ष समिती काम करणार आहे. तसेच गावागावातून सह्यांची मोहीम राबविण्यात येत आहे.

उक्षी रेल्वे स्थानकाचा प्रश्न आता केवळ मागणीपुरता मर्यादित न राहता संघटित लढ्याच्या दिशेने पुढे सरकला असून, 'दिवा–सावंतवाडी' आणि 'सावंतवाडी–दिवा' या गाड्यांना पुन्हा थांबा मिळवून देण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांचा आवाज बुलंद करण्याचा निर्धार कोअर कमिटीने केला आहे.

# आजीच्या संघर्षमय आयुष्याला दिला राजेशाही निरोप

## नातींनी खांद्याला खांदा लावून काढली अंत्ययात्रा; बँड-बाजा आणि आतषबाजी करत भावपूर्ण निरोप

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात एक अत्यंत हृदयस्पर्शी आणि समाजाला नवीन दिशा देणारी अंत्ययात्रा नुकतीच पार पडली. 'आजी' म्हणजे घराचा आधारस्तंभ आणि प्रेमळ सावली. याच लाडक्या आजीला जगातून निरोप देताना नातवंडांनी केवळ रडत न बसता, तिच्या आयुष्याचा उत्सव साजरा करत एक शाही निरोप दिला. बँड–बाजा, फुलांची सजावट आणि अगदी फटाक्यांची आतषबाजी करत, नातींनी स्वतः आजीच्या पार्थिवाच्या खांद्याला खांदा लावून स्मशानभूमीपर्यंत नेले. या भावपूर्ण आणि आगळ्यावेगळ्या अंत्ययात्रेने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले असून, या कृत्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.



मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शहरातील एका प्रतिष्ठित कुटुंबातील आजीचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता, परंतु नातवंडांनी आजीचे आयुष्य हे आनंदाचे आणि समाधानाचे होते, ही भावना व्यक्त करत तिची अंतिम यात्रा संस्मरणीय करण्याचा निर्णय घेतला. परंपरेला छेद देत, केवळ पुरुषच नव्हे, तर घरातील नातींनी पुढाकार घेत आजीची अंत्ययात्रा खांद्यावर उचलली. 'स्त्री–पुरुष समानतेचा' हा संदेश केवळ शब्दांत न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून या नातींनी दाखवून दिला.

या अंत्ययात्रेची सुरुवात घरापासून झाली तेव्हा तिथे बँड–पथक उपस्थित होते. फुलांनी सजवलेल्या रथातून पार्थिव नेले जात असताना वाटेत फटाके फोडून आणि फुलांची उधळण करत जणू काही एखादी मिरवणूकच निघाली आहे, असा भास उपस्थितांना झाला. आजीने आयुष्यभर सर्वांवर केलेले प्रेम आणि दिलेल्या संस्कारांची शिदोरी सोबत घेऊन, हसतमुखाने तिला भावनिक मानवंदना दिली. स्मशानभूमीत पोहचल्यावर ही नितींनी अंत्यविधीच्या सर्व प्रक्रिया पार पाडल्या. कोणत्याही प्रकारचा भेदभाव न ठेवता, घराच्या मोठ्या व्यक्तीला मिळालेला हा सन्मान पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

आजीने आम्हाला भरभरून प्रेम दिले,तिचे आयुष्य पूर्ण झाले होते. तिला दुःखाश्रूंनी निरोप देण्यापेक्षा, तिने दिलेल्या आनंदाच्या आठवणींना उजाळा देत एक उत्सव म्हणून तिला निरोप द्यावा,ही आमची इच्छा होती, अशी भावना यावेळी नातवंडांनी व्यक्त केली. मृत्यूनंतरच्या विधींमध्ये आजही अनेक ठिकाणी रुढी –परंपरांच्या नावाखाली स्त्रियांना मागे ठेवले जाते, मात्र नगरमधील या कुटुंबाने ही मानसिकता बदलत एक आदर्श निर्माण केला आहे.

मृतदेहाला खांदा देणाऱ्या या नातींची चर्चा सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात होत असून, या प्रगत विचारसरणीचे समाजमनातून स्वागत केले जात आहे.

# डॉ.अनिरुद्ध वानकर यांचे खापरखेड्यात भव्य प्रबोधनाचे आयोजन




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, खापरखेडा (नागपूर) :** माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त व सद्भावना दिवसाच्या पर्वावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या वतीने अनुसूचित जाती के लोगो, बीजेपी छोड़ो अभियानाचा भव्य उद्घाटन समारंभ दिनांक २० ऑगस्ट रोजी सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौक खापरखेडा येथे उत्साहात पार पडला.

सदर अभियानांतर्गत संविधान सत्यशोधक जलसा या विशेष प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समतेची–संविधानाची गाणी महापुरुषांची या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमातून संविधान, सामाजिक समता आणि महापुरुषांच्या विचारांचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात आला.

माजी मंत्री सुनील केदार यांच्या मुख्य आयोजनाखाली झालेल्या या सोहळ्यात डॉ. अनिरुद्ध वानकर यांच्या भव्य प्रबोधन कार्यक्रमाला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या प्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्षा मुक्ता कोकोड्डे, माजी उपाध्यक्ष कुंदा राऊत, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अश्विन बैस, गोविंदा ठाकरे, प्रकाश पराते, अनिल रॉय, प्रकाश खापरे, नीलिमा उईके, हेमराज परिहार, राहुल तिवारी, आशिष उपासे, विनय महाजन, प्रकाश माटे, सुनील पांडे, पंढरी उईके, विजय डेव्हिड, प्रमोद डबले, कपिल वानखेडे, रामू बसुले, केवल मेंढे, मिलिंद पाटील, माधव महल्ले, मधुकर दुगाने, गोपाल रामेकर, हंसराज सुखदेवे, पुरुषोत्तम चांदेकर, निकिता रामटेके, सारिका धनविजय आदीसह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संचालन सावनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले तर उपस्थितांचे आभार चिचोली (खापरखेडा) ग्रामपंचायत सरपंच मीनाक्षी तागडे यांनी मानले.

# बोर्डीत मोफत पोलिस भरती प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२१, डहाणू (पालघर) :** ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांना पोलिस भरतीसाठी योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार विनोद निकोले यांच्या संकल्पनेतून डहाणू ट्रायबल चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या मोफत पोलिस भरती प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ शुक्रवारी बोर्डी येथे करण्यात आला. या केंद्राची पहिली बॅच ही आजपासून सुरू झाली.

आर्थिक परिस्थितीमुळे स्पर्धात्मक परीक्षांच्या प्रशिक्षणापासून अनेक विद्यार्थी वंचित राहतात. ही बाब लक्षात घेऊन या प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांना पूर्णपणे नि:शुल्क प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी कोणत्याही प्रकारची प्रशिक्षण फी आकारली जाणार नसल्याचे आयोजकांनी सांगितले.

पोलिस भरतीच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना शारीरिक प्रशिक्षण, मैदानी सराव, लेखी परीक्षेचे मार्गदर्शन तसेच भरती प्रक्रियेबाबत आवश्यक माहिती देण्यात येणार आहे. परिसरातील अधिकाधिक युवकांनी या संधीचा लाभ घेऊन पोलिस दलात भरती होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

उद्घाटन कार्यक्रमास DYSP लाड, घोलवड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक महाला, काहळे, सरपंच दुबळा, कॉ.चंद्रकांत घोरखाना, विकी कुवरा, रोमियो सर यांच्यासह पोलिस कर्मचारी, प्रशिक्षण मार्गदर्शक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डहाणू व परिसरातील ग्रामीण आणि आदिवासी युवकांना पोलिस भरतीची तयारी करण्यासाठी मोफत व दर्जेदार प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध झाल्याने या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे. युवकांना संधी, प्रशिक्षण आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते निश्चितच आपल्या भागाचे नाव उज्ज्वल करू शकतात, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

या मोफत पोलिस भरती प्रशिक्षण केंद्राच्या पहिल्या बॅचला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, युवकांच्या भवितव्याला दिशा देणारा आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

# थोडक्यात बातम्या

## प्रतीक्षा नगर मराठी शाळा क्र.२ च्या आराध्या माळी हिला 'महापौर क्रीडा शिष्यवृत्ती' जाहीर




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग (उपविभाग शारीरिक शिक्षण) वतीने आयोजित सन २०२५–२६ च्या 'महापौर क्रीडा शिष्यवृत्ती प्रदान सोहळा' नुकताच उत्साहात पार पडला. या सोहळ्यात प्रतिक्षानगर मराठी शाळा क्र. २ ची गुणवंत बालखेळाडू कु. आराध्या अरुण माळी हिला कराटे खेळातील राज्यस्तरीय उत्कृष्ट कामगिरीबद्दल मानाची 'महापौर क्रीडा शिष्यवृत्ती', ३ हजार रुपयांचे रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शालेय खेल प्राधिकरणाद्वारे आयोजित शासकीय राज्यस्तरीय कराटे क्रीडा स्पर्धेत आराध्या माळी हिने सहभाग नोंदवून हे घवघवीत यश संपादन केले आहे. एम.जी.क्रॉस रोड कांदिवली येथे आयोजित महापौर क्रीडा शिष्यवृत्ती वितरण सोहळ्यात प्रतीक्षा नगर मराठी शाळा संकुलाच्या खेळाडूंनी अत्यंत आकर्षक कराटे प्रात्यक्षिक (Karate Demonstration) सादर केले. त्यांच्या शिस्तबद्ध हालचालींनी आणि आत्मरक्षणाच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांची दाद मिळवली.

शिक्षण विभागातील उपस्थित मान्यवर उपायुक्त (शिक्षण) डॉ.प्राची जांभेकर, शिक्षण समिती सदस्य निखील व्यास, उपशिक्षणाधिकारी दिपाली पाटील,अधिक्षक शोभा वडियार,जिल्हा क्रीडा अधिकारी सायली जाधव वरिष्ठ पर्यवेक्षक सत्यशिला कांबळे, कनिष्ठ पर्यवेक्षक चंद्रकांत घोडेराव, शा.शि.विभागाचे सर्व कनिष्ठ पर्यवेक्षक यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षकवृंद, प्रशिक्षक आणि पालकांनी आराध्याचे कौतुक करून पुढील क्रीडा प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी प्रतीक्षा नगर मनपा.मराठी शाळा क्र.०२ मुख्याध्यापिका सुजाता वळवी, शारीरिक शिक्षण शिक्षिका माधवी पोकळे, कराटे मास्टर जयेश कदम, कोच वैष्णवी रेडीज, कोच आशुतोष तेलंगे आणि कोच यश माळी उपस्थित होते.

## वहाळ येथे मोफत मधुमेह शिबिर; १५ नवे रुग्ण, ११० जणांची तपासणी



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, सावर्डे (चिपळूण) :** बदलत्या जीवनशैलीमुळे माणसाला अनेक व्याधींना तोंड द्यावे लागत आहे. फास्ट फूड आणि केमिकलयुक्त अन्नामुळे शरीरावर विपरित परिणाम होत आहेत. धावपळीच्या जीवनात स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे छोटा आजारही भविष्यात मोठे रूप धारण करतो. त्यासाठी संतुलित आहार, व्यायाम आणि नियमित तपासणी आवश्यक आहे. देशात मधुमेही रुग्णांची संख्या वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. या पार्श्वभूमीवर नुकतेच लायन्स क्लब सावर्डे–आयडियलच्या वतीने चिपळूण तालुक्यातील वहाळ येथे डॉ.अजित गावकर यांच्या श्री गणेश क्लिनिकमध्ये मोफत मधुमेह तपासणी व उपचार शिबिर यशस्वीरित्या पार पडले

या शिबिरात ११० नागरिकांनी सहभाग घेतला. यामध्ये ५० जुने मधुमेही रुग्ण तर १५ नवीन रुग्णांचे निदान झाले. सर्वांनी मोफत तपासणी, वैद्यकीय मार्गदर्शन आणि औषधोपचाराचा लाभ घेतला. यावेळी डॉ. मृणाल भुवड चू,₆छइ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. लायन अजित गावकर आणि डॉ. लायन स्वाती गावकर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल डॉ. मृणाल भुवड यांचा लायन्स क्लब सावर्डे–आयडियल तर्फे भेटवस्तू वृक्षरोप देऊन सन्मान करण्यात आला. यातून सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी डॉ. अजित गावकर म्हणाले, सेवा हीच खरी मानवता, आरोग्य हीच खरी संपत्ती आणि समाजासाठी केलेले प्रामाणिक कार्य हीच लायन्सची खरी ओळख आहे. श्री गणेश क्लिनिकच्या सर्व स्टाफचे लायन्स क्लबतर्फे आभार मानण्यात आले.

## कलगी तुरा परंपरेचे जतन; मुंबईत २७ ऑगस्टला 'ब्रीदपूजन' सोहळा

### कलगी-तुरा घराण्यांच्या दस्तऐवजीकरणासाठी मंडळाचे आवाहन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, मुंबई :** कलगी तुरा समाज उन्नती मंडळ, मुंबई तर्फे 'ब्रीदपूजन गुरुशिष्य सागरीत मांड' हा धार्मिक, सांस्कृतिक सोहळा गुरुवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी सायं. ४ ते ७ स्थळ कुणबी समाजोन्नती संघ, वाघे हॉल, परळ, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. कलगी – तुरा ही महाराष्ट्रातील शाहिरी लोककलेची समृद्ध परंपरा आहे. या परंपरेचे जतन आणि पुढील पिढीपर्यंत हस्तांतरण हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**महत्त्वाची सूचना :–** मंडळाकडून लवकरच 'कलगी–तुरा : कुळ – घराणे – गुरु – शिष्य परंपरेची नोंद' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रकाशित होणार आहे.

त्यासाठी सर्व चिठ्ठी मालकांनी आपल्या घराण्याची माहिती, वंशावळ, गुरु–शिष्य परंपरा मंडळाकडे जमा करावी. तसेच कलगी तुरा ब्रीदावर सागरीत करणाऱ्यांनी कार्यक्रमस्थळी वेळेत उपस्थित राहून नोंद करावी. सदर ब्रीदपूजन सोहळ्याला सर्व शाहीर, चिठ्ठी मालक व कलाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी केले आहे.

## आज पनवेलमध्ये रंगणार 'मोदक व पुरणपोळी महोत्सव २०२६'

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, पनवेल :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक मराठी खाद्यसंस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि महिला गृहउद्योजिकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने 'मोदक व पुरणपोळी महोत्सव – २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.२२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ ते रात्री ९ या वेळेत विरूपाक्ष मंगल कार्यालय, पनवेल येथे हा महोत्सव पार पडणार आहे.

या महोत्सवाच्या माध्यमातून पनवेल, नवीन पनवेल, कामोठे, खारघर आणि कळंबोली परिसरातील महिला गृहउद्योजिकांना विविध प्रकारचे अस्सल घरगुती मोदक, पुरणपोळी व इतर दर्जेदार खाद्यपदार्थ विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ मिळणार असून, ग्राहक आणि महिला उद्योजिका यांच्यात थेट संपर्क निर्माण होईल. महिलांच्या उत्पादनांचा उच्च दर्जा व स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता प्रितम म्हात्रे यांनी सांगितले की, महिला गृहउद्योजिकांच्या कौशल्याला योग्य बाजारपेठ मिळवून देऊन त्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा यामागील मुख्य उद्देश असून पनवेलकरांनी मोठ्या संख्येने या महोत्सवाला भेट द्यावी. घरगुती चवीचा आनंद लुटण्यासाठी आणि महिला उद्योजिकांच्या हातात बळ देण्यासाठी नागरिकांनी महोत्सवाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन मनपा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.